# **REPORT**

**DEPARTMENT OF ECONOMICS, HISTORY, POLITICAL SCIENCE & PALI-PRAKRIT**

**BOOK RELEASING CEREMONY AND DISCUSSION: 24-12-2018**

**SPEAKERS:**

**DR. SUKHADEO THORAT, EX CHAIRMAN UGC & ICSSR, NEW DELHI**
**DR. SHRINIVAS KHANDEWALE, EX ASSOCIATE PROFESSOR OF ECONOMICS**
**DR. GAUTAM KAMBLE, HEAD, DEPT OF ECONOMICS, DR. AMBEDKAR COLLEGE, NAGPUR**
**DR. SURAJ YENGADE, POST DOCTORAL FELLOW HARVARD KENNEDY SCHOOL, U.K.**



**DR. AMBEDKAR COLLEGE**

NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE
COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE
DEEKSHABHOOMI, NAGPUR-440 010. (M.S.)
▪ PH. : 9579755443 ▪ E-MAIL dacn_ngp@rediffmail.com
▪ VISIT US AT : www.dacn.in

No. AC / ____________ / ______

दिनांक: २१/१२/२०१८

सुचना
प्रसिध्दीसाठी
पुस्तक ग्रंथ प्रकाशन व चर्चा
'द रॅडिकल इन आंबेडकर क्रिटीकल रिफ्लेक्शंस'
डॉ. सुरज येंगडे, अमेरिका व डॉ. आनंद तेलतुंबडे संपादित

द रॅडिकल इन आंबेडकर क्रिटीकल रिफ्लेक्शंस'या ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा सोमवार दि. २४ डिसेंबर, २०१८ ला सांयकाळी ४.३० वाजता आयोजित केली आहे. या कार्यक्रमाचे संयोजन डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथील **अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व पाली–प्राकृत** विभागांनी केले आहे.

या ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाच्या व कर्तृत्वाच्या अनेक ज्ञात व अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला असून त्यांच्या विचारातील क्रांतिकारकत्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या ग्रंथावर खालील वक्ते भाष्य करणार आहेत.

- **प्रा. डॉ. सुखदेव थोरात**
- **प्रा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले**
- **प्रा. डॉ. गौतम कांबळे**

हा कार्यक्रम डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या **ना.ह. कुंभारे** सभागृहात आयोजिला आहे. करिता सर्वांनी उपस्थित रहावे.

(डॉ. पी. सी. पवार)
**PRINCIPAL**
**DR. AMBEDKAR COLLEGE**
**NAGPUR.**

डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी, नागपूर येथील अर्थशास्त्र, इतिहास, पाली प्राकृत, व राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ सुरज येंगडे व डॉ आनंद तेलतुंबडे संपादित 'द राडीकॅल इन आंबेडकर क्रिटिकल रिफ्लेकशन' या पुस्काचे दि. २४/१२/२०१८ रोजी प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी 'देश राज्यटनेनुसारच चालायला पाहिजे. अन्यथा देशातील जनतेत असंतोष निर्माण होईल' असे मत विदयापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.सुखदेव थोरात यांनी व्यक्त केले. त्यांनी या पुस्तकाचे टीकात्मक परीक्षण करून याची उपयुक्तता विद्ध्यार्थ्यसमोर समोर मांडली. त्या वेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. डॉ आंबेडकर यांनी केवळ भारतासाठी नाही तर संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी अमूल्य योगदान दिले आहे . त्यांनी भारताला

दिलेली राज्यघटना जगात सर्वोकृष्ट व सर्वसमावेशक आहे . त्यांच्याशिवाय कुणीही अशी राज्यघटना तयार करु शकले नसते. ही राज्यघटना सर्वांचे कल्याण करणारी आहे. त्यामुळे राज्यघटनेच्या बाहेर जावून कोणतीही कृती या देशात व्हायला नको, असे डॉ  थोरात यांनी पुढे बोलताना सांगितले. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी देश व समाजाकरिता दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही असे विचार अर्थतज्ञ डॉ श्रीनिवास खांदेवाले यांनी व्यक्त केले. वर्तमान काळात या जगाची भांडवलवादी व समाजवादी अशी विभागणी केली जाऊ शकते. देशात एकीकडे मुठभर लोक दिवसेंदिवस अधिक श्रीमंत होत असून दुसरीकडे दारिद्र्य वाढत आहे. ही विषमता पुढील काळात संपणे आवश्यक आहे असे विचार डॉ. गौतम कांबळे यांनी व्यक्त केले. तर डॉ बाबासाहेब आंबेडकर हे सुरवातीपासूनच आंतराष्ट्रीय दर्जाचे व्यक्तिमत्व होते असे डॉ येंगडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मोहन वानखेडे,पाली-प्राकृत विभाग प्रमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अविनाश फुलझेले,इतिहास विभाग प्रमुख यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिक बहुसंखेने उपस्थित होते.













************REPORT CONCLUDED****************